
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 2 | NOVEMBER – 2017

# भारतीय लोकशाही : महात्मा गांधी

**प्रा. डॉ. डि. एस. आठवले**
**सहा. प्राध्यापाक, राज्यशास्त्र विभाग ,**
**श्रीमती कोकीळाबाई गावंडे महिला महा., दर्यापूर.**



## प्रस्तावना :-

भारताच्या इतिहासातील युगप्रवर्तक क्रियाशिल तत्वचिंतकांच्या मालिकेत म. गांधी यांची प्रामुख्याने गणना करावी लागेल. मानवी जीवनाचे भौतिक सत्य व सांस्कृतिक सत्य यांनी शोधून काढले. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हे म. गांधी यांचे ब्रीद होते. गांधीजींनी मांडलेल्या लोकशाही संकल्पनेला आध्यात्मिकतेची बैठक आहे. या सत्य शोधनातून त्यांनी निकोप, स्वस्थ, निर्भय समाजव्यवस्था निर्माण करण्याचा ध्यास घेतला. सत्य आणि अहिंसा या मुल्यांवर आधारित आदर्श समाजव्यवस्था भारतात कशी प्रस्तापित करता येईल हा गांधीच्या नित्य चिंतनाचा विषय होता. सत्य आणि अहिंसेच्या बळावर जे विचार म. गांधींनी मांडले त्याची आज केवळ भारताला नव्हे तर संपूर्ण जगाला आवश्यकता आहे.

## महात्मा गांधींना पाश्चिमात्य उदारवादी लोकशाही दृष्टीकोन अमान्य -

म. गांधींना पाश्चिमात्यांची लोकशाहीची संकल्पना मान्य नव्हती. सांसदीय लोकशाहीप्रणाली मान्य नसण्याचे मुख्य कारण म्हणजे तेथे असलेला प्रामाणिकपणाचा आणि मानवकल्याणाच्या भावनेचा अभाव. गांधीजींच्या मते केवळ ढोंग आणि प्रदर्शनच तेथे असते. पाश्चिमात्य लोकाशाहीवर टिका करतांना गांधी म्हणतात. प्रतिनिधी शासन प्रणाली के अन्तर्गत संसद विधामंडलो और कार्यपालिकाओं पर अत्याधिक खर्च किया जाता है, किंतु इसका नता के कल्याण के लिए कोई सार्थक उपयोग नही हो पाता है। गांधीजी पुढे म्हणतात, जिस प्रकार ब्रिटीश संसद काम करती है, उससे न केवल समय व धन की बरबादी होती है, बल्कि उससे पुंजीवाद का पोषण तथा दुर्बल या निर्धन लोगों का शोषण भी होता है। इस आलोचना के संदर्भ में गांधीजीने कहा है कि जितना समय व धन संसद पर व्यय किया जाता है उतने धन सधनों और समय का विनीयोग यदि भले लोगांद्वारा जनता के लिए किया जाये तो वास्तव में जनताका कल्याण सुनिश्चित किया जाता सकता है।

## गांधीजींचे सत्याचे प्रयोग -

गांधीजींच्या एकूणच कार्य प्रवासाला त्यांनी 'सत्याचे प्रयोग' हे नांव दिले आहे. एकोणिसव्या शतकाचा उत्तरार्ध आणि विसाव्या शतकाचे अध्यशतक हा गांधीजींच्या जीवनाचा कालखंड आहे. या कालखंडातील जागतिक समाजवास्तव व भारतीय समाजवास्तव यांचा गांधीजींनी अभ्यास केला. सुक्ष्म निरीक्षण, व्यापक सखोल चिंतन, दूरदृष्टी, व्रतस्थ आचरण, जनकल्याणकारी, निसर्गरक्षण, संवर्धनकारी दृष्टीकोन या सगळ्या बाबींचा समावेश गांधीजींच्या सत्यशोधनात होतो. सत्याचे प्रयोग आत्मकथेच्या प्रस्तावनेत म. गांधी म्हणतात, "जर मला केवळ सिद्धांताचे म्हणजे तत्वाचे वर्णन करावयाचे असेल, तर मी ही आत्मकथा लिहणारच नाही, परंतु मला त्या सिद्धांतावर रचलेल्या कार्याचा इतिहास द्यावयाचा आहे व म्हणूनच या प्रयत्नाला पहिले नाव मी सत्याचे प्रयोग असे दिले आहे."

शांतिमय असहकाराचा ठराव सर्वानुमते पास झाला, त्याप्रसंगाचे वर्णन गांधीनी सत्याचे प्रयोग यात केले आहे. म. गांधी यांचा समग्र जीवनप्रवास 'सत्याचे प्रयोग' मधून दिसन येतो. गांधी म्हणतात, पुष्कळ प्रतिनिधींकडून अधिक कार्य होते किंवा लोकशाही अधिक भक्कमपणे प्रस्थापित होते ही समजून मला अगदी चुकीची वाटते. पंधराशे प्रतिनिर्धीपेक्षा लोकशाहीचे रक्षण अधिक चांगल्य तऱ्हेने करतील. लोकसत्ता चालायची असेल तर त्यासठी जनतेमध्ये स्वातंत्र्यवृत्ती, स्वाभिमान व एकजुट ही असली पाहीजे आणि चांगेल व सच्चे प्रतिनिधी निवडून देण्याबाबत निर्धार पाहिजे. म. गांधीचा समग्र जीवनप्रवास 'सत्याचे प्रयोग' मधून दिसून येतो. गांधीजींच्या भारतीय लोकशाहीच्या संकल्पनेत विविध मुद्दे अंतर्भूत होतात.

सत्तेचे केंद्रीकरण, शासनाच्या चुकीच्या धोरणांना विरोध करण्यास जनता असमर्थ, शासनाकडून पक्षीय हिताला प्राधान्य आणि जनतेची उपेक्षा इत्यादी आरोप पाश्चिमात्य लोकशाहीवर म. गांधीनी करून तिला विरोध केला आहे. केंद्रामध्ये केवळ मुठभर लोकांच्या हाती सत्ता गेल्यास खऱ्या अर्थाने लोकशाहीची स्थाना होऊ शकत नाही, असे गांधीजींचे मत होते. तळागाळातील मानसासोबतच उच्च वर्णीय माणसाला देखील समान संधी प्राप्त होणे म्हणजे लोकशाही म्हणून लोकशाहीची सुरूवात गावापासून व्हायला हवी.

## निष्कर्ष -

१) सर्वोच्च समाजनिर्मितीचे तत्व हेच खऱ्या अर्थाने लोकशाहीला बळकट व आदर्श बनवू शकते.
२) देशाचा खऱ्या अर्थाने सर्वांगिण विकास साध्य करून नेत्रदिपक प्रगतीसाठी आज गांधीजींच्या लोकशाहीविषयक तत्वप्रणालीशिवाय तरणोपाय नाही.
३) आजच्या भारतीय संसदीय लोकशाहीला खऱ्या अर्थाने म. गांधी यांच्या स्वप्नातील आदर्श लोकशाहीचे स्वरूप द्यायचे असेल तर त्यांच्या दृष्टीकोनाचा पायंडा रूजवण्याचा पर्याय नाही.
४) राष्ट्रीय एकात्मता हाच गांधीजींच्या स्वप्नातील लोकशाहीचा मुलाधार होता ही बाब मान्य करावीच लागेल.
५) आदर्श लोकशाही अस्तित्वात आणण्यासाठी सेवाधर्म, त्याग, नैतिकता यांच्या अस्तित्वाला धोका पोहाचणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.
६) गांधीजींच्या स्वप्नातील आदर्श आणि नवसमाज भारत घडवायचा असेल तर त्यासाठी सत्य, अहिंसा, अस्तेय, शांतता इ. आदर्श संस्कारांचा मौलाचा वाटा आहे.

## संदर्भ ग्रंथ सुची -

१) गांधी नावाचे महात्मा, संपा. रॉय किणीकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
२) गांधी, नलिनी पंडित, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती २००६
३) गांधी नावाचे महात्मा, संपा. रॉय किणीकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
४) हिंद स्वराज : सत्याग्रह आत्मबळ,
५) माझ्या स्वप्नाचा भारत, म. गांधी, परमधाम प्रकाशन, पवनार, वर्धा, २००७
६) आपले गांधी, नारायणभाई देसाई, अनु. डॉ. मु. ब. शहा, डॉ. विश्वास पाटील, गांधी संशोधन प्रतिष्ठान जळगांव
७) भारतीय शासन एवं प्रशान का स्वदेशीकरण, डॉ. ज्योती शर्मा,
८) महात्मा गांधी : धर्म, पंथ एवं राजनीती, डॉ. आदर्शकुमार माथुर,
९) सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, मो. क. गांधी, साकेत प्रकाशन प्रा.लि. औरंगाबाद पाचवी आवृत्ती २००१
१०) सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, मो. क. गांधी, साकेत प्रकाशन प्रा.लि. औरंगाबाद पाचवी आवृत्ती २००१